आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५वाजता

५ सप्टेंबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- शिक्षक आणि पालकांनी मुलांना नेहमी महिलांचा आदर करण्याची शिकवण द्यावी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं देशभरातल्या शिक्षकांना आवाहन, महाराष्ट्रातल्या ५ शिक्षकांचा गौरव

- आरोग्य, शिक्षण, कौशल्यविकास, तंत्रज्ञान क्षेत्रात भारताचे सिंगापूर बरोबर ४ सामंजस्य करार, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भारताकडे रवाना

- २९ हजार रोजगार निर्माण करणाऱ्या ४ औद्योगिक प्रकल्पांना मुख्यमंत्र्यांची मंजुरी

- गेल्यावर्षीच्या नोव्हेंबरपासून यंदा जुलैपर्यंतच्या काळात अवकाळी आणि अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ३०७ कोटी रुपयांचा निधी द्यायला राज्यशासनाची मान्यता

**आणि**

- विविध देशांमधली परिस्थिती पाहता लष्कराला आपत्कालीन परिस्थितीसाठी सज्ज राहण्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांचं आवाहन

**<><><><><>**

शिक्षक आणि पालकांनी मुलांना नेहमी महिलांचा आदर करण्याची शिकवण दिली पाहिजे, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं.

**होल्ड बाईट**

शिक्षक दिनानिमित्त नवी दिल्लीच्या विज्ञान भवन इथं देशभरातल्या ८२ शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांचं वितरण आज राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. त्यावेळी त्या

बोलत होत्या. नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्य विकासावर अधिक भर देण्यात आला असून त्यामुळे मुलांचा सर्वांगीण विकास होतो, असं सांगताना राष्ट्रपतींनी शिक्षण क्षेत्र सर्वसमावेशक केल्याबद्दल शिक्षकांचं कौतुक केलं. यावेळी त्यांनी शिक्षक म्हणून केलेल्या कामाच्या आठवणीही उपस्थितांना सांगितल्या.

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातल्या ५ शिक्षकांचाही समावेश आहे. यात गडचिरोलीतल्या जाजावंडीमधल्या पुपीर प्राथमिक डीजिटल शाळेच्या शिक्षक मंतैया चिन्नी बेडके यांचा समावेश आहे. त्यांच्या कार्याविषयी मंतैय्या बेडके यांनी आकाशवाणीला सांगितलं.

**होल्ड बेडके बाइट (३८ सेकंद)**

कोल्हापूरच्या एसओयू लोहिया शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सागर बागडे, पुण्याच्या प्राध्यापक रामकृष्ण मोरे महाविद्यालयाच्या इंग्रजीच्या प्राध्यापिका शिल्पागौरी गणपुले, पुण्यातल्याच भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेच्या रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक श्रीनिवास होथा आणि कोल्हापूर जिल्ह्यातल्या आयटीआयमधले शिल्प निर्देशक विवेक चांदलिया यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

भारत सिंगापूर दरम्यान आज चार महत्त्वाचे करार झाले. आरोग्य आणि वैद्यक, शिक्षण आणि कौशल्यविकास, डिजिटल तंत्रज्ञान, आणि सेमीकंडक्टर भागीदारी या क्षेत्रात सहकार्याविषयीचे हे करार आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सिंगापूरचे प्रधानमंत्री लॉरेन्स वाँग यांच्यात शिष्टमंडळ स्तरावर चर्चा झाल्यानंतर भारताच्या पूर्वेकडे चला धोरणाच्या अनुषंगाने सिंगापूरबरोबर धोरणात्मक भागीदारी वृद्धिंगत करण्यावर सहमती झाली. त्यानंतर प्रधानमंत्री भारताकडे रवाना झाले. सिंगापूरची भारतात सुमारे १६० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक असून भारतात शाश्वत आणि जलद विकासामुळे गुंतवणुकीच्या अपार संधी खुल्या झाल्या असल्याचं प्रधानमंत्री

मोदी यांनी सांगितलं. उभय देशांमधल्या संरक्षण, सागरी प्रभुत्व, कृत्रिम बुद्धिमत्ता, शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातल्या सहकार्याचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. सिंगापूरमधे भारताचं तिरुवल्लुवर सांस्कृतिक केंद्र लौकरच उभारण्यात येईल, अशी घोषणा प्रधानमंत्री मोदी यांनी केली. त्यानंतर मोदी यांनी सिंगापूरमधल्या सेमीकंडक्टर कंपनीला भेट दिली.

सिंगापूरचे अध्यक्ष थर्मन षण्मुगरत्नम यांचीही मोदी यांनी भेट घेतली. आणि सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले.

<><><><><>

नोव्हेंबर २०२३ ते जुलै २०२४ या कालावधीत अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत म्हणून ३०७ कोटी रुपयांचा निधी वितरीत करायला राज्यशासनानं मंजुरी दिली आहे. याबाबतचा शासननिर्णयही आज जारी केला आहे. शेतकऱ्यांना दिलेला मदतीचा निधी बँकांनी कर्ज खात्यात किंवा अन्य वसुलीसाठी वळती करु नये, याची काळजी घेण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

<><><><><>

यंदा राज्यात १२१ टक्के पाऊस झाला आहे. तसंच राज्यात १०२ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. राज्यात २०१८ नंतर पहिल्यांदाच मोठी धरणं शंभर टक्के भरली असल्याची माहिती आज मंत्रीमंडळ बैठकीत देण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत ही बैठक झाली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत सुमारे १ कोटी ६० लाख लाभार्थ्यांना ४ हजार ७८७ कोटी रुपयांचं वाटप करण्यात आल्याचंही या बैठकीत सांगण्यात आलं. या योजनेमुळं अन्य योजना बंद होणार नाहीत. शेतकरी आत्महत्यांच्या बाबतीत त्यांच्या कुटुंबियांना देण्यात येणारी मदत सुरूच राहणार असल्याचं सरकारनं आज स्पष्ट केलं.

<><><><><>

राज्यात १ लाख १७ हजार २२० कोटी रुपये गुंतवणुकीच्या, उच्च तंत्रज्ञानावर आधारित ४ विशाल प्रकल्पांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मान्यता दिली. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत हा निर्णय झाला. या प्रकल्पांमुळे सुमारे २९ हजार रोजगार निर्माण होणार आहेत.

सेमीकंडक्टर निर्मितीचा प्रकल्प पनवेलमध्ये होणार आहे. एकूण ८३ हजार ९४७ कोटी रुपये गुंतवणुकीच्या या प्रकल्पामुळे १५ हजार रोजगार निर्माण होणार आहेत.

पुण्यातल्या इलेक्ट्रीक वाहन निर्मिती प्रकल्पात एकूण १२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून एक हजार रोजगार निर्माण होतील. छत्रपती संभाजीनगर इथं २१ हजार २७३ कोटी रुपये गुंतवणुकीच्या वाहन प्रकल्पातून १२ हजार रोजगार निर्माण होतील. अमरावती जिल्ह्यात नांदगाव इथं वस्त्रोद्योगात १८८ कोटी एवढी गुंतवणूक आणि ५५० रोजगार निर्मिती होणार आहे.

<><><><><>

लातूरमधल्ये मराठवाडा रेल्वे डबे निर्मिती कारखान्यात आजपासून वंदे वंदे भारत रेल्वे गाड्यांचे शयनयान व्यवस्था असलेले डबे बनवायचं काम सुरू झालं. या कारखान्याला १ हजार ९२० डबे बनवण्याचं आणि पुढील ३५ वर्ष त्यांच्या देखभालीचं काम सोपवण्यात आलं आहे.

<><><><><>

सशस्त्र दलाच्या प्रमुखांनी रशिया-युक्रेन युद्ध, इस्त्राएल-हमास संघर्ष आणि बांगलादेशमधल्या सध्याच्या स्थितीचा आढावा घेऊन कोणत्याही परिस्थितीसाठी सज्ज रहावं असं आवाहन संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी केलं आहे.

लखनौमध्ये सिंग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जॉइंट कमांडर्सच्या परिषदेत ते आज बोलत होते. भारत हा शांतताप्रिय देश असून शांतता कायम राहावी यादृष्टीनं सशस्त्र दलांनी सदैव दक्ष राहावं, असं ते म्हणाले. देशाच्या उत्तर सीमेवरची परिस्थिती आणि शेजारील देशांमधील घडामोडींमुळे प्रादेशिक शांतता आणि स्थैर्य धोक्यात आलं असून लष्कराच्या वरिष्ठ नेतृत्वानं या सर्वांचा अधिक खोलवर अभ्यास करायला हवा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

<><><><><>

केंद्र सरकारनं ३५ रुपये किलोच्या अनुदानित दरानं कांद्याची विक्री आजपासून सुरु केली. दिल्लीत राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात, तसंच मुंबईत लोअर परळ, आणि मालाड, इथं राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघ राष्ट्रीय कृषी सहकारी पणन संघ, ई कॉर्मस मंच तसंच केंद्रीय भंडार आणि सफलच्या विक्री केंद्रांवर आणि व्हॅनद्वारे फिरत्या केंद्रावर ही विक्री केली जाते.

<><><><><>

भारताची आर्थिक वाढ योग्य मार्गावर सुरू असून चालू आर्थिक वर्षासाठी ७ पूर्णांक २ दशांश टक्के सकल राष्ट्रीय उत्पादनाचा अंदाज हा वास्तवाला धरून आहे, असं प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज केलं.भारतीय अर्थव्यवस्था ही स्थूल आर्थिक स्थैर्याने प्रगती करत असल्याचंही त्यांनी यावेळी नमूद केलं. सर्व समावेशक वाढीचं महत्त्वही दास यांनी अधोरेखित केलं.

<><><><><>

पॅरिस पॅरालिंपिकमध्ये तिरंदाज हरबिंदर सिंग आणि पूजा जात्यान यांनी मिश्र सांघिक रिकर्व्ह पात्रता सामन्यात पोलंडच्या मिलेना ओल्सवेका आणि लुकास च्लेक यांचा ६-० असा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. तर भारताची

महिला धावपटू सिमरन हिने महिलांच्या १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत टी १२ प्रकारात अंतिम फेरी गाठली आहे. दरम्यान, पुरुषांच्या ज्युडो स्पर्धेत ६० किलो वजनी गटात भारताच्या कपिल परमार याला इराणच्या खोरम बनिताबा याच्याकडून पराभव पत्करावा लागला. आता तो कास्यपदकासाठी ब्राझीलच्या एलिएल्टन डी ऑलिव्हिराशी लढत देईल.

//<><><><><>//